सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
पोलीस महासंचालक कार्यालय, महाराष्ट्र राज्य
महाराष्ट्र राज्य पोलीस मुख्यालय, शहीद भगतसिंग मार्ग, कुलाबा, मुंबई ४०० ००१

क्र.पोमसं/३६/र.वका.(८३००)शा.नि.-अधिसूचना/०७/२०२५, मुंबई, दि. ई.स्वाक्षरीत नमुद

**संदर्भ**:- महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक दिव्यांग-२०२५/ प्र.क्र.२६/कार्यासन १/E, १४५८४९५, दि.०३/१२/२०२५

**विषय** :- दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम,२०१६च्या कलम ३३ (२) नुसार दिव्यांगांसाठी पद सुनिश्रित करण्यासाठी तज्ञ समितीची पुनर्रचना करणे आणि कार्यपद्वती विहित करणेबाबत.

*****

महाराष्ट्र शासन, गृह विभाग, शासन निर्णय क्रमांक दिव्यांग-२०२५/ प्र.क्र.२६/कार्यासन १/E, १४५८४९५, दि.०३/१२/२०२५ ची प्रत महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेतांक २०२५१२०३१२१३५२३५२९ असा आहे.

२. तरी, सदर शासन निर्णयानुसार कृपया योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

Digitally signed by
Sujata Krishna Pankar
Date: 05-12-2025
14:03:20

( सुजाता पानकर )
कार्यासन अधिकारी
पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचेकरिता.

प्रति,

महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य ,मुंबई. (सस्नेह)
पोलीस महासंचालक, लोहमार्ग, महाराष्ट्र राज्य, मुंबई(सस्नेह).
पोलीस आयुक्त, बृहन्मुंबई.
अपर पोलीस महासंचालक, गुन्हे अन्वेषण विभाग, महाराष्ट्र राज्य, पुणे.
अपर पोलीस महासंचालक,(आस्थापना/कायदा व सुव्यवस्था /आर्थिक गुन्हे/दहशतवाद विरोधी पथक/ विशेष कृती/ प्रशासन/ वाहतूक/ प्रशिक्षण व खास पथके / फोर्स वन नागरी हक्क संरक्षण/ सायबर सुरक्षा / रा.रा.पो.बल / महिला व बाल अत्याचार प्रतिबंधक विभाग), महाराष्ट्र राज्य, मुंबई.
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, महाराष्ट्र राज्य,मुंबई.
सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्ग सह)
अपर पोलीस महासंचालक, व संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक.
अपर पोलीस महासंचालक व संचालक, दळणवळण, माहिती तंत्रज्ञान व परिवहन, महाराष्ट्र राज्य, पुणे.
पोलीस महानिरीक्षक, (नियोजन व समन्वय) , महाराष्ट्र राज्य, मुंबई.

विशेष पोलीस महानिरीक्षक, व्हीआयपी सुरक्षा, महाराष्ट्र राज्य, मुंबई./ मोटर परिवहन विभाग, पुणे/ नक्षल विरोधी अभियान, नागपूर.

विशेष पोलीस महानिरीक्षक (आस्थापना/ कायदा व सुव्यवस्था/ प्रशासन/ प्रशिक्षण व खास पथके), महाराष्ट्र राज्य, मुंबई.

सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक / पोलीस उप महानिरीक्षक.

विशेष पोलीस महानिरीक्षक, राज्य राखीव पोलीस बल, पुणे व नागपूर.

संचालक व विशेष पोलीस महानिरीक्षक, महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी,पुणे.

सर्व पोलीस अधीक्षक ( गुन्हे/ बिनतारी संदेश/लोहमार्ग).

पोलीस अधीक्षक, विशेष कृती दल, सुराबर्डी, अमरावती रोड, नागपूर.

प्राचार्य, गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण केंद्र, नाशिक.

सर्व प्राचार्य पोलीस प्रशिक्षण केंद्र.

सर्व समादेशक, राज्य राखीव पोलीस बल, गट क्र.१ ते १९.

सहायक पोलीस महानिरीक्षक (का.व सु. / दक्षता/ धोरण/ नि.व स.), महाराष्ट्र राज्य, मुंबई.

पोलीस महासंचालक यांचे सर्व वरिष्ठ उप सहायक / उपसहायक.

सर्व कार्यासन अधिकारी, का क्र.१ ते ४४

प्रत :-

पोलीस उप अधिक्षक, संगणक कक्ष, पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.

२. पोलीस उप अधिक्षक, यांना विनंती करण्यात येते की, सदरहू शासन निर्णयाची प्रत या कार्यालयाच्या www.mahapolice.gov.in या संकेतस्थळावर शासन निर्णय/परिपत्रके “सर्वसाधारण" या सदराखाली प्रकाशित करण्यात यावा.

**दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, 2016 च्या कलम 33(2) नुसार दिव्यांगांसाठी पद सुनिश्चिती करण्यासाठी तज्ञ समितीची पुनर्रचना करणे आणि कार्यपद्धती विहित करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**दिव्यांग कल्याण विभाग**
**शासन निर्णय क्रमांक :- दिव्यांग-2025/ प्र.क्र. 26/ कार्यासन 1/ E-1458495.**
31,32,35 "ए" विंग, तिसरा मजला, मित्तल टॉवर
बॅरिस्टर रजनी पटेल मार्ग, नरिमन पॉईंट,
मंत्रालय, मुंबई - 400 021.
**दिनांक :- 03 डिसेंबर, 2025.**

वाचा :

1. दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, 2016
2. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचे शासन परिपत्रक क्र. दिव्यांग-2019/प्र.क्र.251/दि.क.2, दिनांक 12 नोव्हेंबर, 2020.
3. केंद्र शासनाचे सामाजिक न्याय आणि अधिकारिता मंत्रालय, नवी दिल्ली यांची अधिसूचना दिनांक 04 जानेवारी, 2021
4. सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाचा शासन परिपत्रक क्र. दिव्यांग-2019/प्र.क्र.251/दि.क.2, दिनांक 02 फेब्रुवारी, 2021.
5. केंद्र शासनाचे सामाजिक न्याय आणि अधिकारिता मंत्रालय, नवी दिल्ली यांचे कार्यालयीन ज्ञापन, दिनांक 08 नोव्हेंबर, 2024.

**प्रस्तावना :-**

दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, 2016 संपूर्ण देशभरात दिनांक 17 एप्रिल, 2017 पासून लागू करण्यात आला असून दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, 1995 निरसित करण्यात आला आहे. दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, 2016 अन्वये दिव्यांगांच्या 21 दिव्यांग प्रवर्गाचा समावेश करण्यात आला आहे.

दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, 2016 च्या कलम 34 नुसार सरळसेवा व पदोन्नतीमध्ये दिव्यांगांना चार टक्के आरक्षण विहित करण्यात आले आहे. सदर आरक्षण दिव्यांगांचे सक्षमीकरण करण्याच्या उद्देशाने केले आहे. हा उद्देश साध्य करण्यासाठी शासकीय, निमशासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था, स्वायत्त संस्था, महामंडळे इ. मध्ये पदांचा आढावा घेऊन कलम 33 अन्वये दिव्यांगांची पदसुनिश्चिती करणे आवश्यक आहे.

सदर कार्यपद्धती करताना कोणत्याही दिव्यांगावर अन्याय होणार नाही, तसेच विभागाच्या कार्यक्षमतेवर विपरीत परिणाम होणार नाही यानुसार कार्यवाही होणे आवश्यक आहे. त्या अनुषंगाने एकसमान कार्यपध्दती (SOP) आवश्यक आहे.

त्याबाबत केंद्र शासनाने संदर्भ क्र. 3 व संदर्भ क्र. 5 अन्वये कार्यपद्धती विहित केली आहे. त्यानुषंगाने यापूर्वी असलेले संदर्भ क्रमांक 2 व 4 येथील परिपत्रके अधिक्रमित करून सुधारित

शासन निर्णय निर्गमित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्याप्रमाणे पुढीलप्रमाणे शासन निर्णय घेण्यात येत आहे.

**शासन निर्णय :-**

**1.** दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, 2016 च्या कलम 34 नुसार सरळसेवा व पदोन्नतीमध्ये दिव्यांगांना चार टक्के आरक्षण विहित करण्यात आले आहे. कलम 33 अन्वये शासकीय, निमशासकीय, स्थानिक स्वराज्य संस्था, स्वायत्त संस्था, महामंडळे इ. मध्ये पदांचा आढावा घेऊन दिव्यांगांची पदसुनिश्चिती करणे आवश्यक आहे. त्यानुषंगाने दिव्यांगांची पदसुनिश्चिती करण्यासाठी खालीलप्रमाणे कार्यपद्धत विहित करण्यात येत आहे.

1.1 प्रत्येक मंत्रालयीन विभाग यांनी त्यांच्या विभागांतर्गत तसेच अधिनस्थ कार्यालयातील मंजूर पदांच्या संवर्गांमध्ये दिव्यांगासाठी पदसुनिश्चिती करण्यासाठी खालील दिव्यांग प्रवर्गातील किमान एक तज्ञ व्यक्ती/ प्रतिनिधीसह समिती स्थापन करावी.

i. अंध आणि अल्प दृष्टी (Blindness and Low Vision)

ii. कर्णबधीरता आणि ऐकू येण्यातील दुर्बलता (Deaf and Hard of Hearing)

iii. अस्थिव्यंगता/ मेंदुचा पक्षघात (Cerebral Palsy)/ कुष्ठरोग मुक्त (leprosy cured)/ शारिरीक वाढ खुंटणे (dwarfism)/ आम्ल हल्लाग्रस्त (acid attack victims)/ स्नायु विकृती (muscular dystrophy)

iv. स्वमग्नता (Autism)/ आकलन क्षमतेची कमतरता (Intellectual Disability)/ विशिष्ट शिक्षण अक्षमता (Specific learning disability)/ मानसिक आजार (mental illness)

अशी समिती केवळ विभागांच्या स्तरावरच गठित केली जाईल, त्याचे अध्यक्ष विभागाचे अप्पर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव असतील.

1.2 उक्त समितीची कार्ये खालीलप्रमाणे असतील:-

i समितीने सहाय्यक तंत्रज्ञानातील विकास, तसेच केंद्र शासनाने दिनांक 04.01.2021 रोजीच्या अधिसूचनेन्वये दिव्यांगांसाठी सुनिश्चित केलेली पदे आणि दिव्यांग व्यक्तींच्या रोजगारातील जागतिक मानके विचारात घेऊन त्यांच्या आस्थापनांतील विशिष्ट श्रेणीतील दिव्यांगत्वासाठी प्रत्येक/सर्व संवर्गाच्या योग्यतेचा अभ्यास करून विभागातील सर्व संवर्गांसाठी पदसुनिश्चिती करणे आवश्यक आहे, याबाबत परिशिष्ट “अ” प्रमाणे दिव्यांग कल्याण विभागास प्रस्ताव सादर करावा.

ii एखाद्या संवर्गासाठी पदसुनिश्चितीमधून सूट द्यावयाची असल्यास सदर समितीने त्याबाबतचा प्रस्ताव दिव्यांग कल्याण विभागास समर्पक कारणमीमांसेसह सादर करावा.

iii सदर समितीने दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, 2016 च्या कलम 33(3) अन्वये, किमान ३ वर्षातून एकदा पदसुनिश्चिती केलेल्या संवर्गांचा आढावा घ्यावा.

iv यापूर्वी एखादा संवर्ग लक्षणीय दिव्यांगत्व असलेल्या दिव्यांगांसाठी राखीव असल्यास सदर संवर्ग त्या लक्षणीय दिव्यांगांसाठी सुनिश्चित राहील.

v जे पद निम्न स्तरावर (फिडर केडर) दिव्यांगांसाठी सुनिश्चित केले असेल अशा पदाच्या पदोन्नती साखळीतील सर्व संवर्ग सदर दिव्यांग प्रवर्गासाठी सुनिश्चित राहतील. (If a post is identified in the feeder grade, all the posts in the promotional grade should also stand identified.)

2. दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, 2016 च्या कलम 33(2) तसेच संदर्भ क्रमांक २ व ४ अन्वये गठीत केलेली समिती अधिक्रमित करून खालीलप्रमाणे पुनर्गठीत करण्यात येत आहे.

| अ.क्र. | नाव/पदनाम, विभाग | पदनाम |
|---|---|---|
| 1 | अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव , दिव्यांग कल्याण विभाग | अध्यक्ष |
| 2 | अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव,सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग | सदस्य |
| 3 | अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव, विधी व न्याय विभाग | सदस्य |
| 4 | अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव (सेवा), सामान्य प्रशासन विभाग | सदस्य |
| 5 | अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग | सदस्य |
| 6 | अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव, उद्योग विभाग | सदस्य |
| 7 | ज्या विभागाचा प्रस्ताव आहे, त्या संबंधित विभागाचे अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव | सदस्य |
| 8 | आयुक्त, दिव्यांग कल्याण, पुणे | सदस्य |
| 9 | उपसचिव, दिव्यांग कल्याण विभाग | सदस्य सचिव |
| 10 | संचालक,वैद्यकीय शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई | सदस्य |
| 11 | संचालक, आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई | सदस्य |
| 12 | विभाग प्रमुख नेत्र चिकित्सा विभाग (नेत्र), ग्रँट मेडीकल कॉलेज, मुंबई | सदस्य |
| 13 | विभाग प्रमुख, कान,नाक,घसा चिकित्सा विभाग (कर्णबधीरता), ग्रँट मेडीकल कॉलेज, मुंबई | सदस्य |
| 14 | विभाग प्रमुख, अस्थिव्यंग चिकित्सा विभाग (शारिरीक दिव्यांगता), ग्रँट मेडीकल कॉलेज, मुंबई | सदस्य |

| | | |
|---|---|---|
| 15 | विभाग प्रमुख, मज्जातंतू चिकित्सा विभाग (सेरेब्रल पाल्सी), ग्रँट मेडीकल कॉलेज, मुंबई | सदस्य |
| 16 | विभाग प्रमुख, त्वचा विकार चिकित्सा विभाग (लेप्रसी क्युअर्ड पर्सन्स), ग्रँट मेडीकल कॉलेज, मुंबई | सदस्य |
| 17 | विभाग प्रमुख, औषध वैद्यकशास्त्र (मेडिसीन) (ब्लड डिसऑर्डर), ग्रँट मेडीकल कॉलेज,मुंबई | सदस्य |
| 18 | विभाग प्रमुख, शरीर विकृती शास्त्र, (पॅथोलॉजी) (ब्लड डिसऑर्डर), ग्रँट मेडीकल कॉलेज, मुंबई | सदस्य |
| 19 | संचालक, नॅशनल इन्स्टिट्युट फॉर द एम्पॉवरमेंट ऑफ परसन्स् विथ डिसॲबिलिटी (दिव्यांगजन) (NIEPID) | सदस्य |
| 20 | डीन आणि उप कमांडंट, सशस्त्र बल चिकित्सा महाविद्यालय (AFMC), पुणे | सदस्य |
| 21 | संचालक, ऑल इंडिया इन्स्टिटयुट ऑफ फिजिकल मेडिसिन, हाजी अली, मुंबई. | सदस्य |
| 22 | संचालक, अली यावर जंग राष्ट्रीय वाचा आणि श्रवण संस्था, बांद्रा (पश्चिम), मुंबई. | सदस्य |

3. दिव्यांग कल्याण विभागांतर्गत असलेल्या तज्ञ समितीची कार्ये खालीलप्रमाणे आहेत: -

3.1 सर्व मंत्रालयीन प्रशासकीय विभागांनी त्यांच्या अधिनस्थ कार्यालयातील दिव्यांगांसाठीच्या सुयोग्य पदांचा शोध घेण्याबाबत सर्व पदांचा एकत्रित प्रस्ताव संबंधित विभागाच्या समितीच्या अभिप्रायासह उपरोक्त तज्ञ समितीच्या मान्यतेसाठी ठेवण्याकरीता सोबतच्या विवरणपत्र "अ" मधील नमुन्यात विभागास निर्णय घेण्यासाठी पाठविण्यात यावा.

3.2 दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, 2016 च्या कलम 34(1) मधील तरतुदीनुसा शासनाला कोणत्याही शासकीय आस्थापनेला या कलमाच्या तरतुदीतून सूट देण्याचा अधिकार देतो. अशी सूट देण्यासाठी दिव्यांग कल्याण विभागाच्या वरील तज्ञ समितीची मान्यता अनिवार्य आहे.

3.3 पदे निश्चित करणे ही एक गतिशील प्रक्रिया असल्याने, तंत्रज्ञानाचा विकास, नवीन आणि अधिक कार्यक्षम सहाय्यक उपकरणांची उपलब्धता, दिव्यांग व्यक्तींची क्षमता वाढवणे इत्यादी बाबी लक्षात घेऊन वेळोवेळी सवलतीचा आढावा घेतला जाईल.त्यामुळे, कोणतीही सूट (Exemption) जास्तीत जास्त 3 वर्षांच्या कालावधीसाठी वैध असेल. ज्या आस्थापनांना दिव्यांग कल्याण विभागाद्वारे आधीच सूट देण्यात आली आहे आणि सूट (Exemption) अधिसूचित केल्याच्या तारखेपासून 3 वर्षांचा कालावधी पूर्ण झाला आहे, अशा आस्थापना सूटेच्या पुनरावलोकनासाठी नवीन प्रस्तावासह दिव्यांग कल्याण विभागाकडे शासन निर्णय निर्गमित केल्याच्या तारखेपासून 3 महिन्यांच्या आत प्रस्ताव सादर करतील.

दिव्यांग सुनिश्चितीकरण प्रक्रियेचा योग्य, दक्षतेने आणि अत्यंत काळजीपूर्वक वापर केला पाहिजे, जेणेकरून 3 वर्षांच्या कालावधीत सूट मिळवण्याची आवश्यकता भासणार नाही.

3.4 सदर समितीची कार्यकक्षा संबंधित मंत्रालयीन विभागांकडून प्राप्त प्रस्ताव तपासून सदर पदांवर कार्य करण्यास कोणती दिव्यांग व्यक्ती सक्षम आहे ते निश्चित करणे व त्याबाबत अंतिम निर्णय घेणे असेल.

समितीने घेतलेल्या निर्णयानंतर याबाबतची अधिसूचना दिव्यांग कल्याण विभागामार्फत निर्गमित करण्यात येईल.

समितीचे अध्यक्ष आवश्यकतेनुसार एखाद्या व्यक्तीस, संस्थेस किंवा संबंधीत विभागाच्या अधिकाऱ्यांस बैठकीसाठी आमंत्रित करु शकतील.

4. एखाद्या मंत्रालयीन विभागाकडून एखादा संवर्गासाठी दिव्यांग पद्सुनिश्चीती केली नसल्यास किंवा त्या संवर्गास दिव्यांग पद्सुनिश्चीतीतून सूट Exemption) दिली नसल्यास, असे पद आरक्षणासाठी पात्र असलेल्या सर्व श्रेणीतील/ सर्व प्रकारच्या दिव्यांगत्वासाठी सुनिश्चित केल्याचे मानले जाईल.

5. प्रत्येक मंत्रालयीन विभागाने सोबत परिशिष्ट “ब” प्रमाणे त्यांच्या संकेतस्थळावर दरवर्षी 01 जानेवारी रोजी प्रसिध्द करावे आणि त्याची प्रत आयुक्त, दिव्यांग कल्याण व दिव्यांग कल्याण विभाग यांना सादर करावी.

6. प्रत्येक मंत्रालयीन विभागाने सरळसेवा भरती करताना संबंधित परीक्षा यंत्रणेकडे (उदा: MPSC, IBPS इ.) तसेच पदोन्नती करताना संबंधित यंत्रणेकडे तीन वर्षात एकदा कलम 33(3) प्रमाणे दिव्यांग पद्सुनिश्चीततेचा आढावा घेतल्याचे परिशिष्ट “क” प्रमाणे प्रमाणपत्र सादर करणे बंधनकारक राहील.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आलेला असून त्याचा संगणक सांकेतांक २०२५१२०३१६००४४०४३५ असा आहे. हा शासन परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

TUKARAM H MUNDHE

Digitally signed by TUKARAM H MUNDHE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=PDWD, 2.5.4.20=D60C97125DD88B1F415C73CDEF592D0F67518BBD8BA278837219A7B9D7324AEC, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=57B59F48D85074D9EA4B3BACF05E19E7030E9F2B74772901E229A4BAE0497214, cn=TUKARAM H MUNDHE
Date: 2025.12.03 16:01:55 +05'30'

**(तुकाराम मुंढे)**
**सचिव, महाराष्ट्र शासन.**

**प्रति,**

1) मा. राज्यपाल यांचे सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
2) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
3) मा. उपमुख्यमंत्री (वित्त विभाग व नियोजन विभाग) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
4) मा. उपमुख्यमंत्री (नगर विकास विभाग ) यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.

5) मा. विरोधी पक्ष नेता, विधानसभा/विधान परिषद, विधानमंडळ, मुंबई.
6) मा.विधानसभा/विधान परिषद सर्व सदस्य, विधानमंडळ सचिवालय, मुंबई
7) मा. मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
8) अपर मुख्य सचिव/ प्रधान सचिव/ सचिव, सर्व मंत्रालयीन विभाग, मुंबई.
9) आयुक्त, दिव्यांग कल्याण, आयुक्तालय, पुणे.
10) सर्व जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय.
11) सर्व पोलीस आयुक्त/ अधीक्षक.
12) सर्व आयुक्त, महानगरपालिका.
13) सर्व प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण कार्यालय.
14) सहाय्यक आयुक्त, मुंबई शहर / मुंबई उप नगर.
15) सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद.
16) सर्व उपविभागीय दंडाधिकारी, उपविभाग.
17) सर्व समाज कल्याण अधिकारी,जिल्हा परिषद.
18) भारतीय जनता पार्टी,महाराष्ट्र प्रदेश, सी.डी.ओ.बॅरेक नं.1,योगक्षेमसमोर, वसंतराव नाईक चौक, नरिमन पॉईन्ट, मुंबई 400 021.
19) इंडियन नॅशनल कॉंग्रेस, महाराष्ट्र प्रदेश, कॉंग्रेस (आय) समिती, टिळक भवन, काकासाहेब गाडगीळ मार्ग, दादर, मुंबई 400 025.
20) राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टी, राष्ट्रवादी भवन, फ्री प्रेस जर्नल मार्ग,नरिमन पॉईन्ट,मुंबई 400021.
21) शिवसेना, शिवसेना भवन, गडकरी चौक, दादर, मुंबई 400 028.
22) बहुजन समाज पार्टी, महाराष्ट्र कमिटी, जनशक्ती हॉल, ग्लोब मिल पॅलेस, वरळी,मुंबई 400013.
23) भारतीय कम्युनिस्ट पार्टी,महाराष्ट्र कमिटी जनशक्ती हॉल, ग्लोब मिल पॅलेस, वरळी, मुंबई.
24) भारतीय कम्युनिस्ट (मार्क्सवादी) पार्टी, महाराष्ट्र कमिटी, जनशक्ती हॉल, ग्लोब मिल पॅलेस, वरळी, मुंबई.
25) महाराष्ट्र नवनिर्माण सेना, राजगड, मातोश्री टॉवर, शिवाजी पार्क, दादर, मुंबई - 400 028.
26) निवड नस्ती/कार्यासन-1.

## परिशिष्ट "अ"

प्रत्येक मंत्रालयीन विभागांच्या आस्थापनांवरील पदांची दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, 2016 च्या कलम 33 अन्वये दिव्यांग कल्याण विभागाच्या पदसुनिश्चिती करण्याबाबतच्या तज्ञ समितीसमोर प्रस्ताव सादर करण्याचा नमुना.

| अ.क्र. | संवर्गाचे पदनाम | शारिरीक पात्रता | दिव्यांग प्रवर्ग | सदर पदांची जबाबदाऱ्या व कर्तव्ये | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| | | | | | |

## परिशिष्ट "ब"

प्रत्येक मंत्रालयीन विभागाने माहिती भरून त्यांच्या संकेतस्थळावर दरवर्षी 01 जानेवारी रोजी प्रसिध्द करावयाचा नमुना.

**विभागाचे नाव :**

1)

| अ.क्र | एकूण संवर्ग संख्या | दिव्यांगांसाठी पदसुनिश्चित केलेली संख्या | दिव्यांग कल्याण विभागाची मान्यता घेऊन वगळण्यात आलेली संवर्ग संख्या | पदसुनिश्चिती करावयाची शिल्लक पदे | शेरा |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 |
| | | | | | |

2)

| अ.क्र | पदसुनिश्चित केलेल्या संवर्गाचे नाव | शारिरीक पात्रता | सुनिश्चित केलेले दिव्यांग प्रवर्ग |
|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 |
| | | | |

## परिशिष्ट "क"

प्रमाणित करण्यात येते की, -------------------- या विभागातील -------------------- संवर्गाची दिव्यांग पद्सुनिश्चीती ------------------ तारखेस करण्यात आली आहे. सदरबाबतचा आढावा दिव्यांग व्यक्ती हक्क अधिनियम, 2016 च्या कलम 33(3) नुसार-------------------- तारखेस आढावा घेण्यात आला आहे.

**नियुक्ती प्राधिकारी/ संबंधित विभागाचे सचिव**
**स्वाक्षरी**